!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४९५ ३०-४-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## खासदार चंद्रकांत खैरे, राष्ट्रीय रस्ते महामार्ग प्राधिकरण, एमएसईबी, बीएसएनएल, एमआयडीसी, जागतिक बैंक, एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम विभागाची संयुक्त पाहणी

संभाजीनगर दि 7- केंब्रिज शाळा ते नगर नाका असा 14.5 किमीचा रस्ता 45 मीटर रुंदीचा दहा पदरी मंजूर होऊन पाच महिने उलटले तरी काम सुरु झाले नसल्याने जमीन अधिग्रहणाअभावी रखडलेल्या जालना रोडच्या विषयात खासदार चंद्रकांत खैरे यांनी लक्ष घातले असून जालना रोड व बीड बायपास विस्तारीकरण कामाला गती मिळावी यासाठी राष्ट्रीय रस्ते महामार्ग प्राधिकरण, एमएसईबी, बीएसएनएल, एमआयडीसी, जागतिक बैंक, एमएसआरडीसी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना घेऊन आज संयुक्त पाहणी केली. यावेळी खासदार चंद्रकांत खैरे यांनी अधिकाऱ्यांनी समन्वय साधून राष्ट्रीय रस्ते प्राधिकरणाला मदत करण्याचे निर्देश दिले व कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या

यावेळी नगरसेवक नंदकुमार घोडेले, नगरसेवक ऋषिकेश खैरे, राष्ट्रीय रस्ते महामार्ग प्राधिकरण चे संचालक यु जे चांभरगोरे, यु एन घोटकर, एमएसईबी चे अधीक्षक अभियंता प्रभाकर निर्मळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत फुटाणे, सहा अभियंता सत्यनारायण, शाखा अभियंता आर बी गावडे, बीएसएनएल उपमहाप्रबंधक एच बी शेवगाकर, डी के शेंडे, बी एम चिटणीस, एमएसआरडीसी चे कार्यकारी अभियंता विक्रम जाधव, उपअभियंता उदय भरडे, एमआयडीसी चे श्री गावडे, सहा अभियंता आर पी बडवे, यांच्यासह जागतिक बैंक प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

केंब्रिज शाळा ते नगर नाका असा 14.5 किमीचा रस्ता 45 मीटर रुंदीचा दहा पदरी रस्ता व बीड रोडवरील झाल्टा फाटा ते पैठण रोडवरील महानुभाव आश्रम या रस्त्याचेही विस्तारीकरण याच योजनेत होणार असून हा प्रकल्प 850 कोटींचा आहे. अंतिम आराखडा तयार असतांना जमिन अधिग्रहणामुळे कामात अडथळा निर्माण झाला असल्याने काम सुरु करण्यास उशीर होत असल्याचे प्रकल्प संचालक यू. जे. चामरगोरे यांनी जिल्हा विद्युतीकरण समितीच्या बैठकीत शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या निदर्शनास आणून दिले होते त्यावर खासदार खैरे यांनी संबंधित सर्व विभागांच्या अधिकारयांच्या संयुक्त पाहणीचे निर्देश बैठकीत दिले होते. त्यानुसार आज पाहणी करण्यात आली व जालना रोड वरील प्रस्तावित 03 भुयारीमार्ग ,05 फूटओव्हरब्रीज, नव्या पाच उड्डाणपूलांच्या जागेची पाहणी आज खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली. व त्या जागी येणाऱ्या अडथळया विषयी संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी समन्वय करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बीड रोडवरील झाल्टा फाटा ते महानुभाव आश्रम या रस्त्यावर चार उड्डाण पूल प्रस्तावित आहेत त्या जागेंचीही पाहणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली. विमानतळासमोरच्या उड्डाणपुलासंदर्भात लवकरच विमानतळ प्राधिकरण अधिकाऱ्यांशी, व आर्मीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करणार असल्याचे खासदार खैरे यावेळी म्हणाले.

रस्ता रुंदीकरणाचा मावेजाच आजपर्यंत मिळाला नाही तो मावेजा देण्याच्या दृष्टीने कोणतीच पावले आतापर्यंत आलेल्या कोणत्याही आयुक्तांनी उचलली नाहीत त्यामुळे पैसे मिळाल्याशिवाय अधिग्रहणास नागरिक आता तयार होणार नाहीत. त्यात महापालिकेची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने अधिग्रहण हे राष्ट्रीय रस्ते महामार्ग प्राधिकरणाने करावे अशी मागणी भूपृष्ठ जलवाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे करणार असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले. एमएसईबीचे अधीक्षक अभियंता प्रभाकर निर्मळे यांनी झाल्टा फाटा ते महानुभाव आश्रम या रस्त्यावर दोन्ही बाजूंनी 33 केव्ही, 11 केव्ही, एल टी लाईन्स भूमिगत करण्याचा व एअरकुल एस एफ 6 आर एम यु असलेला प्रस्ताव जलद गतीने तयार करण्यात यावा व भविष्यातील विद्युतीकरणाची मागणी लक्षात घेऊन त्यासाठी चे डक्स व लाईन च्या जागेचा प्रस्ताव तयार करावा असे आदेश अधिकार्यांना दिले. शहरअभियंता सखाराम पंझाडे यांनी भूसंपादनास आवश्यक मावेजा रकमेची प्राथमिक माहिती उपलब्ध करून देऊ असे यावेळी सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**


कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525